आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१० जुलै २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- रशियन सैन्यात मदतनीस असणाऱ्या भारतीयांना परत पाठवण्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची विनंती रशियाकडून मान्य

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची ऑस्ट्रियाचे अध्यक्ष कार्ल नेहॅमर यांच्याशी व्हिएन्ना इथं भेट

- आरक्षणाच्या मुद्द्यावरून गदारोळ झाल्यामुळे महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात गदारोळ / विधानपरिषदेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- महाराष्ट्रातल्या विदर्भ आणि मराठवाड्यामधल्या काही जिल्ह्यांना सकाळी भूकंपाचे धक्के

**आणि**

- उत्तर प्रदेशच्या उन्नाव जिल्ह्यात आज सकाळी झालेल्या अपघातात १८ जणांचा मृत्यू, १९ जण जखमी

**<><><><><>**

रशियन सैन्यात मदतनीस म्हणून काम करणाऱ्या भारतीय नागरिकांना लवकरात लवकर मायदेशी पाठवण्याची भारताची मागणी रशियानं मान्य केली आहे, अशी माहिती परराष्ट्र सचिव विनय क्वात्रा यांनी माध्यमांना दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी झालेल्या अनौपचारिक चर्चेदरम्यान हा मुद्दा उपस्थित केला, तेव्हा पुतिन यांनी मोदी यांची विनंती तात्काळ मान्य केली. सध्या रशियन सैन्यात ३५ ते ५० भारतीय मदतनीस म्हणून काम करतात.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज ऑस्ट्रियातल्या व्हिएन्ना इथं ऑस्ट्रियाचे अध्यक्ष कार्ल नेहॅमर यांची भेट घेतली. आपल्या समाज माध्यमांवरच्या संदेशात मोदी यांनी नेहॅमर यांनी स्वागत केल्याबद्दल त्यांचे आभार मानले. भारत-ऑस्ट्रियाची मैत्री आगामी काळात आणखी मजबूत होईल, असंही त्यांनी या संदेशात म्हटलं आहे. ऑस्ट्रियाचे अध्यक्ष कार्ल नेहॅमर यांनीही या भेटी बाबत आनंद व्यक्त केला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं ऑस्ट्रियामध्ये स्वागत करणं ही आनंदाची आणि सन्मानाची बाब असल्याचं नेहॅमर यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

टपाल विभागातर्फे देशभरात राबवण्यात येणार असलेल्या उपक्रमांचा आढावा दूरसंचार मंत्री जोतीरादित्य शिंदे यांनी काल घेतला. टपाल विभाग आजपासून १०० दिवस देशभरात ५ हजार डाक चौपालचं आयोजन करणार आहे. टपाल खात्याकडून दिल्या जाणाऱ्या सुविधा आणि कार्यक्षमता वाढवण्याच्या उद्देशानं काय उपाययोजना करता येतील याबाबत काल झालेल्या बैठकीत चर्चा करण्यात आली. ग्रामीण भागात सामान्य नागरिक आणि प्रशासन यांच्यातल्या कामासंदर्भातील सुलभता सुनिश्चित करण्यासाठी डाक चौपाल महत्त्वाची भूमिका बजावतील, अशी माहिती मंत्रालयानं दिली आहे. ग्रामीण निर्यातीला चालना देण्यासाठी १०० दिवसांत ३ हजार निर्यातदार डाकघर निर्यात केंद्र या संकेतस्थळावर आणण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे. आवश्यक दस्तऐवजांसाठी मदत, बाजारासंदर्भातली माहिती, बार-कोडेड लेबल आणि सीमेवर लागणारा परवाना पेपरविरहित प्रक्रीयेनं उपलब्ध करुन देणं यासह इतर आवश्यक त्या सेवा डाक चौपाल उपक्रमाच्या माध्यमातून पुरवल्या जातील.

**<><><><><>**

आरक्षणाच्या मुद्द्यावरून आज विधानसभेत गदारोळ झाला आणि सभागृहाचं कामकाज आधी ३ वेळा तहकूब करावं लागलं. मराठ्यांना ओबीसी मध्ये आरक्षण

द्यावं का यावर विरोधी पक्षाने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी केली. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी मराठा समाजाची माफी मागितली पाहिजे, अशी मागणी आशिष शेलार यांनी केली. त्यानंतर सत्ताधारी आक्रमक राहिल्यानं आधी ५ आणि नंतर १० मिनिटांसाठी कामकाज तहकूब झालं. पुन्हा कामकाज सुरू झाल्यावरही सत्ताधारी सदस्यांचा गदारोळ कायम राहिला. विरोधी पक्षनेते वडेट्टीवार यांना बोलू दे असं आवाहन, अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केलं. मात्र सत्तारूढ सदस्यांनी जोरदार घोषणाबाजी करत प्रचंड गदारोळ केला. त्यामुळे अध्यक्षांनी कामकाज पुन्हा ४५ मिनिटांसाठी तहकूब केलं.

<><><><><>

मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीला विरोधक गैरहजर राहिल्याचा मुद्दा आमदार प्रवीण दरेकर यांनी मांडल्यावर विरोधक आणि सत्ताधारी पक्षांच्या आमदारांनी हौद्यात उतरून प्रचंड गोंधळ आणि घोषणाबाजी केली. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रयत्न करूनही शांतता प्रस्थापित न झाल्याने या गदारोळातच पुरवणी मागण्या मंत्री उदय सामंत यांनी सभागृहासमोर मांडल्या. त्यावर एकमत झाल्याची घोषणा उपसभापतींनी केली. गदारोळ सुरूच राहिल्यानं विधानपरिषदेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

<><><><><>

दुधातली भेसळ रोखण्यासाठी अन्न आणि औषध प्रशासनाला अत्याधुनिक तंत्रज्ञान, यंत्रसामुग्री, आणि पुरेसं मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक निधी देण्याचं आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत दिलं.

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेचा फायदा एक लाखांहून अधिक अधिकारी आणि कर्मचारी यांनी घेतला असल्याचं निष्पन्न झालं आहे, ज्यांनी पात्र नसतानाही याचा लाभ घेतला अशा तीस हजार तीनशे त्रेपन्न  शिधापत्रिका धारकांवर

ते नोकरीला असलेल्या विभागांमार्फत कारवाई केली जाईल, अशी माहिती अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

<><><><><>

राज्यसरकार शेतकरी विरोधी भूमिका घेत असल्याचा आरोप आज विधानपरिषदेत विरोधी पक्ष नते अंबादास दानवे यांनी केला.

नापिकी, कर्जाचा बोजा, पीक विम्यातल्या अडचणी, शेतमालाला बाजारभाव आदी समस्यांमुळे शेतकरी त्रस्त आहे. आणि सरकार केवळ मदतीच्या घोषणा करीत आहे, असं ते म्हणाले.

शेतकऱ्यांचे १० हजार २२ कोटी ६४ लाख रुपये शेतपिकांच्या नुकसानीचे तर ५ हजार ९७५ कोटी रुपयांचे कर्ज मुक्त करण्याचे असे एकूण १५ लाख ९९७ कोटी ६४ लाख रुपये सरकारकडे शेतकऱ्यांची थकबाकी आहे,असा तपशील त्यांनी दिला. २०२३ मध्ये १५ जिल्ह्यातल्या मिळून २४ तालुक्यात गंभीर स्वरूपाचा दुष्काळ तर १६ तालुक्यात मध्यम स्वरूपाचा दुष्काळ घोषित करण्यात आला. शासनानं दुष्काळग्रस्त १०२१ महसूल मंडळांमध्ये सवलती जाहीर करूनही अद्याप शेतकरी मदतीपासून वंचित आहेत, असं ते म्हणाले.

कांदा निर्यात धोरण दुटप्पी असून गुजरात, मध्यप्रदेश मधून बोगस बी बियाणं, खत हे शेतकऱ्यांच जीवन संपवण्याचं काम करतं, राष्ट्रीयकृत बँका शेतकऱ्यांना जुमानत नाहीत, मागेल त्याला शेततळं ही योजना केवळ कागदावर राहिली आहे, असं दानवे म्हणाले.

<><><><><>

देशातल्या सात राज्यांमधल्या तेरा विधानसभा मतदारसंघांमधे आज पोटनिवडणुकीसाठी मतदान सुरू आहे. पश्चिम बंगालमधल्या रायगंज, राणाघाट दक्षिण, बागडा आणि मणिकतला, हिमाचल प्रदेशमधल्या देहरा, हमीरपूर आणि नालागढ तसंच उत्तराखंडमधल्या बद्रीनाथ आणि मंगलौर या मतदारसंघात मतदान

होत आहे. तसंच मध्यमप्रदेशमध्ये अमरवाडा, बिहारमध्ये रुपौली, तमिळनाडूमध्ये विक्रवंडी आणि पंजाबमधल्या जालंधर पश्चिम मतदारसंघात मतदान सुरू आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या मराठवाडा आणि विदर्भातल्या काही जिल्ह्यांना आज सकाळी ७ वाजून १६ मिनिटांनी भूकंपाचे धक्के बसले. भूकंपाची तीव्रता साडेचार रिक्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली. भूकंपाचा केंद्रबिंदू मराठवाड्यातल्या हिंगोली जिल्ह्यातल्या कळमनुरी तालुक्यातल्या रामेश्वर तांडा गावात होता. भूकंपामुळे कोणतीही जिवीत अथवा वित्त हानी झालेली नाही. मराठवाड्यातल्या नांदेड, परभणी आणि हिंगोली तर विदर्भातल्या वाशिम इथंही भूकंपाचे धक्के जाणवले. नागरिकांनी घाबरून न जाता सतर्कता बाळगावी, असं आवाहन जिल्हा प्रशासनानं केलं आहे.

दरम्यान, मराठवाडा, विदर्भातील जिल्ह्यांत झालेल्या भूकंपाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन आणि आपत्ती निवारण यंत्रणेला सतर्क राहण्याचे निर्देश दिल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशच्या उन्नाव जिल्ह्यात आज सकाळी झालेल्या अपघातात किमान १८ जणांचा मृत्यू झाला असून १९ जण जखमी झाले आहेत. लखनौ-आग्रा द्रुतगती मार्गावरून जाणाऱ्या दुधाच्या टँकरला डबल डेकर बसनं धडक दिल्यानं हा अपघात झाला. घटनास्थळी बचावकार्य सुरू असून जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात अपघातातल्या मृतांच्या कुटुंबीयांप्रति सहवेदना  व्यक्त केली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देखील दुर्घटनेविषयी दुःख व्यक्त केलं. मृतांच्या नातेवाईकांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येकी दोन लाख रुपये आणि जखमींना ५० हजार रुपयांच्या

मदतीची घोषणा प्रधानमंत्र्यांनी केली आहे.  उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी जखमींवर योग्य उपचार करण्याचे निर्देश दिले आहेत.

<><><><><>

जम्मू काश्मीरमधल्या दोडा जिल्ह्यात संरक्षण दल आणि दहशतवाद्यांमध्ये काल चकमक झालेल्या ठिकाणी शोधमोहीम राबवली जात आहे. संरक्षण दलाने काल शोधमोहीम सुरू केली होती. पण, अंधार आणि पावसामुळे मोहीम थांबवण्यात आली होती. आज दिवस सुरू होताच संरक्षण दलांच्या जवानांनी पुन्हा जंगलात लपलेल्या दहशतवाद्यांचा शोध सुरू केला.

<><><><><>

गोव्यातल्या पेडणे इथं अतिवृष्टीमुळे बोगद्यात पाणी शिरल्यानं कोकण रेल्वे मार्गावरच्या अनेक गाड्या आज रद्द करण्यात आल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवरून मडगावला जाणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेस, जनशताब्दी एक्सप्रेस, मांडवी एक्सप्रेस तसंच, मंगळुरू एक्सप्रेस या गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. मडगावहून मुंबईच्या दिशेने येणाऱ्या मांडवी एक्सप्रेस, तेजस एक्सप्रेस, जनशताब्दी एक्सप्रेस आणि सावंतवाडी-दिवा एक्सप्रेस या गाड्याही आज रद्द झाल्या आहेत. काल सुटलेली हजरत निजामुद्दीन-एर्नाकुलम मंगला एक्स्प्रेस पनवेल-लोणावळा-पुणे-मिरज-मडगाव या मार्गे वळवण्यात आली आहे, अशी माहिती कोकण रेल्वेने दिली आहे. दरम्यान रत्नागिरी जिल्ह्यात कोसळणाऱ्या अति मुसळधार पावसामुळे मंडणगड बाणकोट रस्त्यावरच्या तुळशी घाटात दरड कोसळून वाहतूक ठप्प झाली आहे. मंडणगड ते अंबडवे दरम्यान राष्ट्रीय महामार्गावर रस्ता रुंदीकरणासाठी डोंगर कापण्याचं काम सुरू आहे.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघटनेचा सर्वोत्कृष्ट खेळाडूचा बहुमान जून २०२४ करता जसप्रीत बुमराह आणि स्मृती मानधना या भारतीय क्रिकेटपटूंनी मिळवला आहे.

नुकत्याच झालेल्या T20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत बुमराहच्या गोलंदाजीमुळे भारतीय संघाला विश्वचषकाला गवसणी घालता आली.

**<><><><><>**

ईशान्य आणि पूर्व भारतात पुढच्या दोन ते तीन दिवसांत जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**